CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। शनिवार, दि. १४ सप्टेंबर २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३४६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८




## बनावट नोटरीच्या आधारे फसवणूक

**सोलापूर :** बनावट नोटरीच्या आधारे खरेदी देऊन फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ फेब्रुवारी रोजी घडली.याप्रकरणी आदित्य गायकवाड (वय-२१, रा.शहा नगर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष शंकर गायकवाड व संजय शंकर गायकवाड (रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ६) यांच्याविरुद्ध आठ महिन्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपींनी अब्दुल अजीज अब्दुल कादर शेख (रा. गुलबर्गा) यांच्या मालकीची नेहरूनगर येथील खुली जागा बनावट नोटरीच्या आधारे आदित्य यांच्या नावाने खरेदी देऊन फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पो.स.ई.कुतवळ हे करीत आहेत.

# आरक्षणाचा वाद चिघळणार

## जरांगेंना जशास तसे उत्तर देण्याची ओबीसी नेते हाकेंची भीमगर्जना

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकीकडे महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात जागा वाटपाची मारमार सुरू असताना दुसरीकडे सामाजिक स्तरावर पाडापाडीच्या राजकारणाला ऊत येण्याची चिन्हे दिसत आहेत. मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाची घोषणा केल्यानंतर ओबीसी आरक्षण चळवळीचे नेते लक्ष्मण हाके यांनी देखील १७ सप्टेंबरपासून उपोषण करण्याचा निर्धार बोलून दाखवला आहे.सत्ताधाऱ्यांचे उमेदवार पाडण्याचा इशारा जरांगे यांनी यापूर्वीच दिला आहे तर हाके यांनी मराठवाड्यातील जरांगेंची पाठराखण करणाऱ्या २५ आमदारांना पाडण्याचा प्रतिइशारा दिला आहे.त्यामुळे आरक्षणावरून तीव्र संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत.




- मराठवाड्यात २५ आमदार पाडणार
- मुख्यमंत्री शिंदे यांनाही दिला इशारा

जरांगे हे मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधत मध्यरात्री १२ वाजल्यापासून आमरण उपोषण सुरू करत आहेत. ओबीसी नेते आणि उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांनीही उपोषणाची घोषणा केली. जरांगे हे ज्या ठिकाणी बसतील,त्याच ठिकाणी आपले उपोषण असेल,असे हाकेंनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे फक्त मराठा जातीचे मुख्यमंत्री नाहीत, त्यांना ओबीसींची ताकद या निवडणुकीत दिसेल, असे म्हणत हाकेंनी मनोज जरागेंचे उपोषण सुरू होताच, आपणही उपोषण सुरू करणार असल्याचे म्हटले आहे.

जरांगे यांच्याकडून सातत्याने आमदार पाडण्याची भाषा केली जाते, आता हाके यांनीही ओबीसींकडूनही मराठवाड्यात २५ आमदार पाडण्यात येणार असल्याचे म्हटलं आहे. म्हणजेच, आरक्षणासाठी सुरू झालेली लढाई आता आमदारांना पाडापाडीची बनताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे सामाजिक आरक्षणाचा लढा, आता राजकीय होताना दिसून येत आहे.

### मोठा गौप्यस्फोट...

हाके यांनी एका मराठी न्यूज चॅनेलशी बोलताना म्हटले की, जरांगे ज्या ठिकाणी उपोषणाला बसतील त्याच्या दुसऱ्या दिवशी, त्याच ठिकाणी ओबीसीचे उपोषण सुरू झालेले दिसेल. जरांगे यांना त्यांच्याच भाषेत आणि त्यांच्याच ताकदीने ओबीसी देखील उत्तर देतील. नुसत्या मराठवाड्यात २५ आमदार ओबीसींकडून पाडण्यात येणार आहेत. आमच्याकडे त्या २५ आमदारांची यादीही तयार आहे. त्यामुळेच आता काही आमदार निवडणूक न लढवण्याच्या भूमिकेत उतरू लागले आहेत, असा गौप्यस्फोटही हाके यांनी केला आहे.

### मुख्यमंत्र्यांनाही दिला इशारा

या विधानसभेला शरद पवार, काँग्रेस यांना ओबीसी मोठा दणका देणार आहेत. जे नेते जरांगेंना भेटलेत, त्याची यादी आमच्याकडे असून त्या सर्व आमदारांना आणि नेत्यांना निवडणुकीत ओबीसी धूळ चालणार आहे, असेही हाकेंनी म्हटलं आहे. तसेच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जरांगेंच्या दबावाखाली वाटेल ते मागण्या मान्य करण्याच्या तयारीत असून यातील एकही मागणी कायद्याच्या चौकटीत टिकणारी नाही. त्यामुळे, मुख्यमंत्र्यांनाही याची किंमत मोजावी लागेल, असा इशाराही हाके यांनी मुख्यमंत्री शिंदेंना दिला आहे.

## महिलेच्या गळ्यातील सव्वा तोळ्याचे गंठण हिसकावून मोटरसायकलस्वराने पळ काढला

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

कुर्डूवाडीतील एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मीनी गंठण अंदाजे ८० हजार रुपये किंमतीचे सव्वा तोळ्याचे गंठण अज्ञात मोटरसायकल स्वाराने हिसकावून घेऊन पळ काढला. ही घटना दि.१२ सप्टेंबर रोजी दुपारच्या दरम्यान कुर्डुवाडी येथील बालोद्यान चौकातील बंद रेल्वे गेट येथे घडली. महिलेचे नाव समजून शकले नाही. महिलांनी सतर्क राहण्याची गरज आहे.

एक महिला शहरातून खरेदी करून पिशव्या घेऊन घराकडे रेल्वे कॉलनी परिसराकडे जाण्यासाठी कुर्डुवाडी येथील बंद रेल्वे गेट ओलांडून चालत गेली. यावेळी रिक्षाची वाट पाहत थांबले असताना यावेळी मोटरसायकल स्वार महिलेच्या समोर येऊन उभा राहिला व त्याने गळ्यातील सव्वा तोळे ८० हजार रुपये किंमतीचे मिनी गंठण हिसकावून घेऊन रेल्वे कॉलनीच्या दिशेने पळून गेला. एकटी महिला असल्याचे पाहून चोरट्याने संधी साधली असावी. तो चोरटा मोटरसायकल वर एकटाच असल्याचे सांगितले जात आहे.ऐन सणासुदीच्या काळात महिलांच्या गळ्यातील सोने हिसकावून नेण्याचे प्रकार घडण्याची शक्यता असल्याने इतर महिलांनी सतर्क राहाण्याची गरज आहे.



या प्रकारामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी नंबर नसलेल्या दुचाकी वाहनचालकांची चौकशी करून यांच्यावर कारवाई करण्याची करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## मंत्री सावंत यांच्या पुतण्याच्या घराबाहेर गोळीबार

**धाराशिव/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत यांच्या घरासमोर गुरूवारी रात्री दोन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याने एकच खळबळ उडाली आहे. धनंजय सांवत हे सुखरूप आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवारी या जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.या दौऱ्याच्या तोंडावर हा प्रकार घडल्यामुळे पोलीस दल हादरून गेले.तणाव परसल्यानंतर पोलिसांनी वेळीच स्थिती नियंत्रणाल आणली.

गुरूवारी मध्यरात्री १२ वाजून ३७ मिनिटांनी धनंजय सावंत यांच्या सोनारी येथील बंगल्यासमोर अज्ञात दोन व्यक्तींनी बंदुकीतून तीन फायर केले. यावेळी धनंजय सावंत हे त्यांच्या घरामध्ये होते



तर त्यांचे सुरक्षा रक्षक बाहेर होते. गोळीबार करताच अज्ञात फरार झाले असून धनंजय सावंत आणि त्यांचे सुरक्षा रक्षक सुरक्षित आहेत. गोळीबार कोण केला हे अद्याप निश्चित झाले नसून याबाबत धनंजय सावंत व त्यांच्या सुरक्षारक्षकांना गोळीबार कोणी केला हे माहित नाही. याबाबत आंबी पोलीस स्टेशनला धनंजय सावंत यांच्या सुरक्षा रक्षकांनी तक्रार दिली आहे.

### मुख्यमंत्री शिंदेंच्या दौऱ्याआधी या घटनेमुळे उडाली खळबळ

#### ठाकरे-पवार गटासोबत वादाची किनार

दोन दिवसांपूर्वी खंडेश्वरी प्रकल्प पूजनाच्या वेळी उद्धव ठाकरे गट, शरद पवार गट आणि सावंत गट यांच्यामध्ये किरकोळ वादावाद झाली होती. गोळीबाराला या वादाचीच किनार असल्याची चर्चा सध्या जिल्हाभरात आहे. पोलीस तपासांती निष्पन्न होईल की यामागे कोण आहे, अज्ञात व्यक्ती कोणत्या पक्षाचे आहेत किंवा कोणी त्यांना गोळीबार करायला लावला हे तपासांती निश्चित होईल. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करतील.

## पहिला मान गुजरातला! ३ हजार वंदे मेट्रो सुरू होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

वंदे भारत ट्रेनच्या अनेक सेवा देशभरात सुरू आहेत. त्यात नवनवीन सेवांची भर पडत आहे. वंदे भारत ट्रेनच्या यशस्वीतेनंतर वंदे भारत ट्रेनच्या स्लीपर व्हर्जनच्या प्रोटोटाइप मॉडेलचे रेल्वेमंत्र्यांनी अनावरण केले.

अवघ्या काही महिन्यात पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन सेवेत येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यातच आता वंदे भारत मेट्रो लवकरच सुरू केली जात आहे. वंदे भारत मेट्रो ट्रेनच्या चाचण्या पूर्ण झाल्या असून, पहिली वंदे भारत मेट्रो ट्रेन देशाच्या सेवेत येण्यास सज्ज झाली आहे. याचा पहिली मान गुजरातला मिळाल असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्या वंदे भारत मेट्रोला हिरवा झेंडा दाखवणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## अनगर अप्पर तहासील कार्यालयाचे अखेर उद्घाटन

**मोहोळ/प्रतिनिधी**


खास बाब म्हणून मंजूर केलेल्या अनगर अप्पर तहसील कार्यालयाविषयी उच्च न्यायालयात नेमकी शुक्रवारी सुनावणी असतानाच याच दिवशी (दि.१३) कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे.

प्रशासनाने इतकी घाई का केली याबद्दल तालुक्यात आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तालुक्याच्या उत्तर आणि पूर्व भागातील शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या मागणीनुसार महाराष्ट्र शासनाच्या महसूल आणि वन विभागाच्या वतीने महिनाभरापूर्वी महसूल आणि वनमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंजूर केलेल्या अनगर अप्पर तहसील कार्यालयाचा शुक्रवारी प्रारंभ सायंकाळी ४ वाजता अनगर येथील कृषीभूषण दादा बोडके यांच्या हस्ते करण्यात आला.

अनगर आणि आजूबाजूच्या गावातील शेतकरी यावेळी उपस्थित होते. अनगर अप्पर तहसील कार्यालयाच्या अप्पर तहसीलदारपदाचा अतिरिक्त कार्यभार मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक आणि नायब तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार मोहोळचे नायब तहसीलदार प्रवीणकुमार वराडे यांच्याकडे शासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाद्वारे दिला आहे. शुक्रवारी सायंकाळी चार वाजता नायब तहसीलदारपदाचा पदभार डॉ. प्रवीणकुमार वराडे यांनी स्वीकारला. यावेळी जिल्हाधिकारी प्रशासनाने अनगर अप्पर कार्यालयासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचेही स्वागत आणि सन्मान दादा बोडके आणि अनगरमधील विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मोहोळ तहसीलदारांना प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय सुरु केले आहे. त्याबाबतचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला दिल्याचे सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




इलेक्ट्रिक गाड्या आल्यात, आता तरी इतका गर्व सोड!

कल्याण
247-30-389

मुंबई
245-13-229

## दक्षिणवर ठाकरे गटाचा दावा; काँग्रेसच्या भूमिकेकडे लक्ष



### सांगली पॅटर्न होणार का? चर्चेला उधाण

**सोलापूर/प्रतिनिधी**

शिवसैनिकांचा मेळावा घेत खासदार संजय राऊत यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघावर दावा आणखी मजबूत करत अमर पाटील यांची उमेदवारी अप्रत्यक्षपणे जाहीर केली आहे. त्यामुळे आता काँग्रेसच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकसभेप्रमाणे दक्षिण विधानसभा मतदारसंघात सांगली पॅटर्न घडणार का याची उत्सुकता असून याची चर्चा जोरदार सुरू आहे.

#### ... तर काँग्रेसमधून बंडखोरी अटळ

या मतदारसंघातून काँग्रेसकडून तब्बल १७ जण इच्छुक आहेत. माजी आमदार दिलीप माने यांनी तर गेल्या पाच वर्षांपासून येथे तयारी सुरू केली आहे. सुरेश हसापुरे, महादेव कोगनुरे हेही मतदारसंघात दौरा करत आहेत. ही जागा जर ठाकरे गटाला गेली तर काँग्रेसमध्ये बंडखोरी अटळ मानली जात आहे.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांचा गुरुवारी मेळावा झाला. या मेळाव्यातून खासदार संजय राऊत यांनी दक्षिण सोलापूर मतदारसंघातून मशाल विधानसभेत पाठवावी, असे आवाहन शिवसैनिकांना करत तुमच्या मनातील उमेदवार असणार असे जाहीर करत अमर पाटील यांची उमेदवारी अप्रत्यक्षपणे जाहीर केली. वास्तविक महाविकास आघाडीची जागा वाटपाची बोलणी पूर्ण होण्यापूर्वीच शिवसेनेने दक्षिण मतदारसंघावर दावा ठोकत उमेदवारीचे संकेत दिले आहे. त्यामुळे ठाकरे गट आणि काँग्रेस वादावादी होण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळीही खासदार संजय राऊत यांनीच जागा वाटप होण्याच्या अगोदरच सांगली मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली होती, त्यावेळी सांगली मतदारसंघातून काँग्रेसकडून इच्छुक असलेले विशाल पाटील यांनी बंडखोरी करत लोकसभेची निवडणूक लढवली. आताही दक्षिण विधानसभा मतदारसंघात तसाच प्रकार होईल का याची उत्सुकता लागली आहे. दक्षिण विधानसभा मतदारसंघावर आतापर्यंत काँग्रेसचेच निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. गेल्या दहा वर्षांपासून हा मतदारसंघ भाजपकडे गेला आहे. असे असताना राऊत यांची भूमिका वादाला तोंड फोडणारी आहे. चौकट

## कच्चा माल, औषधांची परस्पर खरेदी-विक्री करत संस्थेची फसवणूक

### महिला डॉक्टरसह दोघांवर गुन्हा

**सोलापूर :** संगनमत करून एमआयडीसी अक्कलकोट रोडवरील शेठ सखाराम नेमचंद रसशाळा येथे कच्चामाल व तयार औषधांच्या जाणीवपूर्वक नोंदी न करता परस्पर खरेदी व विक्री करून अपहार करून संस्थेची २ लाख ८८ हजार ४८० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी महिला डॉक्टरसह दोघाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ एप्रिल ते १ जून २०२४ दरम्यान एमआयडीसी अक्कलकोट रोड येथे घडली. याप्रकरणी डॉ. आदर्श हर्षवर्धन मेहता (वय-५१, रा.रेल्वे लाईन, हिंदुस्तान कॉन्व्हेंट समोर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अवधूत भालचंद्र वैद्य (रा.बसवराज नगर, नीलम नगर) व महिला डॉक्टर प्रज्ञा प्रकाश कुलकर्णी (रा.उमा गृहनिर्माण सोसायटी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास मसपो.नि. घोरपडे या करीत आहेत.

CMYK